International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ : पार्श्वभूमी

**प्रा. ज्योती दिलीप भापकर[1], डॉ. सुधीर वाडेकर[2]**

[1]*संशोधन केंद्र, हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा कॉलेज, अहिल्यानगर*

[2]*अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर.*

*Corresponding Author – प्रा. ज्योती दिलीप भापकर*

**DOI - 10.5281/zenodo.18864254**

***सारांश:***

*पश्चिम महाराष्ट्र हा प्रदेश कृषी, सहकार आणि राजकारण यांचा संगम असलेला भाग म्हणून ओळखला जातो. सहकारी साखर कारखाने, पाटबंधारे प्रकल्प आणि शेतकरी संघटनांच्या माध्यमातून या भागात शेतकरी चळवळींनी एक विशिष्ट स्वरूप धारण केले आहे. मात्र, उत्पादन खर्च, हमीभाव, पाणीवाटप, कर्जबाजारीपणा आणि बाजारव्यवस्थेतील असमतोल यांमुळे शेतकरी वर्ग सतत संघर्ष करताना दिसतो. प्रस्तुत संशोधन निबंधात पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक-आर्थिक कारणे, प्रमुख संघटना व नेते, तसेच समकालीन काळातील आंदोलनांचे स्वरूप यांचा अभ्यास करण्यात आला आहे.*

**प्रस्तावना:**

भारत हा जगातील एक प्रमुख कृषीप्रधान देश असून, भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण समाजव्यवस्थेचा कणा 'शेती' आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात झालेल्या हरितक्रांतीने देशाला अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण केले असले, तरी शेती करणाऱ्या कष्टकरी वर्गाचे आर्थिक आणि सामाजिक प्रश्न मात्र अधिक जटिल होत गेले आहेत. "ए. आर. देसाई यांच्या मते, भारतातील शेतकरी संघर्ष हा केवळ आर्थिक मागण्यांपुरता मर्यादित नसून तो ग्रामीण भारतातील सामाजिक संरचनेत बदल घडवून आणण्याचा एक प्रयत्न आहे . झोया हसन यांच्या मते, भारतीय किसान युनियनसारख्या शेतकरी संघटनांनी 'बिगर-राजकीय' पवित्रा घेऊन सरकारशी वाटाघाटी करण्याची प्रभावी रणनीती अवलंबली आहे. मात्र, या संघटनांच्या मागण्या प्रामुख्याने बाजाराभिमुख असून त्या ग्रामीण भागातील सधन शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करतात . शेतकरी संघटनेचे राजकीय पक्षात झालेले रूपांतर ही केवळ रणनीती नसून ती शेतकऱ्यांच्या मागण्यांना धोरणात्मक कायदेशीर स्वरूप देण्याचा एक प्रयत्न होता. मात्र, या राजकीय प्रवासात चळवळीच्या मूळ संघटनात्मक रचनेत अनेक बदल घडून आले. शिबादास घोष यांच्या मते, भारतातील क्रांती ही 'लोकशाही क्रांती' नसून ती 'समाजवादी क्रांती' च्या दिशेने जाणारी असावी. शेतीमधील भांडवलशाही घटकांचा पराभव करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते.

महाराष्ट्राच्या संदर्भात विचार केला असता, 'पश्चिम महाराष्ट्र' हा प्रदेश कृषी प्रगतीचा मानबिंदू मानला जातो. मात्र, याच सुपीक आणि प्रगत मानल्या जाणाऱ्या प्रदेशात शेतकरी चळवळींचा इतिहास अत्यंत संघर्षमय आणि वैचारिक पायावर उभा राहिलेला दिसतो.पश्चिम महाराष्ट्राची ओळख ही प्रामुख्याने सहकार चळवळ, बागायती शेती आणि राजकीय सत्तेचे केंद्र अशी आहे. कृष्णा, भीमा आणि गोदावरी नद्यांच्या खोऱ्यात विस्तारलेल्या या प्रदेशात ऊस, द्राक्षे, कांदा आणि दूध यांसारख्या नगदी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकाराने सुरू झालेली सहकारी साखर कारखानदारी

या प्रदेशासाठी वरदान ठरली. परंतु, कालांतराने या सहकारी संस्थांचे राजकीयीकरण झाले आणि त्यातूनच सत्तेचे नवे केंद्रीकरण निर्माण झाले. या प्रक्रियेत सामान्य आणि अल्पभूधारक शेतकरी परिघाबाहेर फेकला गेला, ज्यातून असंतोषाची पहिली ठिणगी पडली . त्यानंतरच्या काळात शरद जोशी यांच्या 'शेतकरी संघटनेने' "शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव" ही संकल्पना मांडून या चळवळीला व्यापक आणि आक्रमक स्वरूप दिले. त्यांनी 'भारत' आणि 'इंडिया' यातील भेद स्पष्ट करत शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा लढा पुकारला.समकालीन काळात, जागतिकीकरण आणि मुक्त बाजारपेठेच्या धोरणांमुळे शेतीसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. हवामानातील लहरीपणा, उत्पादन खर्चात झालेली भरमसाठ वाढ, बाजारव्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी आणि सरकारी धोरणांमधील अस्थिरता यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आजही आंदोलनाच्या भूमिकेत आहे. राजू शेट्टी यांच्या 'स्वाभिमानी शेतकरी संघटने'सारख्या संघटनांनी ऊस दर आणि एफआरपी सारख्या मुद्द्यांवरून हा लढा सक्रिय ठेवला आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे पश्चिम महाराष्ट्रातील या चळवळींची सामाजिक-आर्थिक मुळे शोधण्याचा आणि समकालीन आव्हानांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक चळवळी आणि शेतकरी चळवळीची संकल्पना:**

सामाजिक चळवळी म्हणजे समाजातील विद्यमान व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकांनी संघटितपणे केलेले प्रयत्न होत. आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय अन्यायाविरुद्ध उभ्या राहणाऱ्या चळवळींना सामाजिक चळवळी म्हणता येते. शेतकरी चळवळ ही सामाजिक चळवळींचाच एक महत्त्वाचा प्रकार असून ती प्रामुख्याने ग्रामीण समाजातील आर्थिक शोषणाविरोधात उभी राहते.भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने शेतकरी चळवळींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पारंपारिक शेतीपद्धती, तंत्रज्ञानाचा अभाव आणि भांडवलाची कमतरता यामुळे शेतकरी वर्ग दीर्घकाळ शोषित राहिला. १९९३ नंतर भारत-इस्राईल कृषी सहकार्यामुळे आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असला, तरी इस्राईलच्या धर्तीवर कृषी विकास भारतात पूर्णतः साध्य झालेला दिसून येत नाही.

**पश्चिम महाराष्ट्राची कृषी व सामाजिक पार्श्वभूमी:**

पश्चिम महाराष्ट्रामध्ये कृष्णा, भीमा आणि गोदावरी खोऱ्यांमुळे शेतीस पोषक परिस्थिती आहे. ऊस, गहू, ज्वारी, भाजीपाला, द्राक्षे ही येथील प्रमुख पिके आहेत. स्वातंत्र्यानंतर पाटबंधारे प्रकल्प आणि सहकारी साखर कारखान्यांमुळे येथील शेतीचे व्यापारीकरण झाले.सहकारी चळवळीमुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळाले, परंतु या विकासाचा लाभ प्रामुख्याने मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांपुरताच मर्यादित राहिला. कोरडवाहू आणि अल्पभूधारक शेतकरी मात्र मागे पडले. याच विषमतेतून पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी असंतोष आणि चळवळी उदयास आल्या.

**ऐतिहासिक वैचारिक पार्श्वभूमी:**

प्राचीन काळापासून शेतीला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. आर्य संस्कृतीमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय मानला जात होता. निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांनी शेतीला संपत्तीचे मुख्य साधन मानले. चाणक्यांनी ‘अर्थशास्त्र’ ग्रंथात कृषी विकासाकडे राज्यकर्त्यांनी लक्ष द्यावे, असे प्रतिपादन केले. महात्मा जोतिराव फुले यांनी ‘शेतकऱ्यांचा असूड’ या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या शोषणाचे वास्तव मांडले. शेतकरी कर्जबाजारी झाल्यावर त्याच्या कुटुंबावर होणारे दुष्परिणाम त्यांनी प्रभावीपणे स्पष्ट केले.

न्या. महादेव गोविंद रानडे हे आधुनिक भारताच्या अर्थशास्त्राचे जनक मानले जातात. त्यांनी भारतीय शेती आणि

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अत्यंत मूलभूत आणि शास्त्रीय विचार मांडले. न्या. रानडे यांनी भारतीय दारिद्र्याचे मुख्य कारण 'शेतीवर अवलंबून असणारी अतिरिक्त लोकसंख्या' हे असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, जोपर्यंत शेतीवरील हा बोजा कमी होऊन लोक उद्योगांकडे वळत नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांची प्रगती होणार नाही. त्यांनी शेती आणि उद्योगांचा समतोल विकास साधण्याचा आग्रह धरला.१८७५ चे दख्खनचे दंगे आणि रानडे यांची भूमिका मांडली पश्चिम महाराष्ट्रात (पुणे, अहमदनगर जिल्हा) १८७५ मध्ये सावकारी पाशाविरुद्ध शेतकऱ्यांनी उठाव केला, ज्याला 'दख्खनचे दंगे' म्हणतात. न्या. रानडे यांनी 'पुणे सार्वजनिक सभे'च्या माध्यमातून या दंगलींची चौकशी केली आणि सरकारला एक सविस्तर अहवाल सादर केला. शेतकऱ्यांच्या या उठावाचे मूळ कारण सावकारांचे शोषण आणि ब्रिटीशांची अन्यायकारक सारा पद्धत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.शेतकऱ्यांच्या उठावानंतर सरकारने १८७९ मध्ये 'दख्खन शेतकरी साहाय्य कायदा' संमत केला.न्या. रानडे यांनी या कायद्याचे स्वागत केले, कारण यामुळे शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून कायदेशीर संरक्षण मिळाले. त्यांनी या कायद्याद्वारे शेतकऱ्यांची कर्जे तपासून ती कमी करणे किंवा रद्द करणे यांसारख्या तरतुदींचे समर्थन केले.शेतकरी सावकारांच्या तावडीत सापडू नये म्हणून त्यांना स्वस्त दरात कर्ज मिळणे आवश्यक आहे, असे रानडे मानत. त्यासाठी त्यांनी 'कृषी बँका' स्थापन करण्याची संकल्पना मांडली. सरकारी पाठबळ असलेल्या या बँकांनी शेतकऱ्यांना दीर्घमुदतीची कर्जे द्यावीत, असा त्यांचा आग्रह होता. हीच कल्पना पुढे सहकारी चळवळीचा आधार बनली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी प्रश्न:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ दलितांच्या उद्धारासाठीच नव्हे, तर भारतीय शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या हक्कासांठी देखील अत्यंत पायाभूत कार्य केले आहे. त्यांच्या दृष्टीने शेतकरी प्रश्न हा केवळ आर्थिक प्रश्न नसून तो सामाजिक न्यायाशी जोडलेला होता.पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक परिप्रेक्ष्यात डॉ. आंबेडकरांचे शेतकरी विषयक विचार आणि कार्य खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येईल. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात प्रचलित असलेल्या 'खोती' या अन्यायकारक जमीनदारी पद्धतीविरुद्ध डॉ. आंबेडकरांनी तीव्र लढा दिला. १८ मार्च १९२७ रोजी महाड येथे झालेल्या सभेत त्यांनी खोती पद्धती रद्द करण्याची मागणी केली. १४ एप्रिल १९३७ रोजी त्यांनी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धत रद्द करण्यासाठी विधेयक मांडले. शेतकऱ्यांचे शोषण थांबवण्यासाठी जमीनदार आणि कुळ यांच्यातील मध्यस्थ (खोत) नष्ट करणे आवश्यक आहे, असे त्यांचे ठाम मत होते.डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या 'States and Minorities' या ग्रंथात शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यांच्या मते:शेती हा राज्याचा उद्योग असावा.,जमिनीची मालकी सरकारची असावी आणि ती शेतकऱ्यांना सामूहिक शेतीसाठी वाटून द्यावी,शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, भांडवल आणि खतांचा पुरवठा सरकारने करावा, जेणेकरून उत्पादकता वाढेल.तसेच भारतातील शेतजमिनीचे तुकडीकरण ही शेतीच्या मागासलेपणाचे मुख्य कारण असल्याचे त्यांनी ओळखले होते. लहान जमिनीवर शेती करणे परवडणारे नसल्यामुळे त्यांनी 'सामूहिक शेती'चा पुरस्कार केला. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेणे शक्य होईल, असा त्यांचा विश्वास होता.डॉ. आंबेडकरांनी केवळ जमीनदार शेतकऱ्यांचाच विचार केला नाही, तर भूमिहीन शेतमजुरांच्या प्रश्नांनाही वाचा फोडली. स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून त्यांनी शेतमजुरांसाठी किमान वेतन, कामाचे तास निश्चित करणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यांसारख्या मागण्या केल्या.भारताचा शेतकरी केवळ पावसावर अवलंबून राहू नये, यासाठी डॉ. आंबेडकरांनी जलनीतीमध्ये मोठे बदल सुचवले.

व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य असताना त्यांनी दामोदर व्हॅली प्रकल्प, हिराकुड प्रकल्प आणि सोन नदी प्रकल्पाची पायाभरणी केली. "पाणी हे राष्ट्राची संपत्ती आहे आणि त्याचा उपयोग शेती व विजेसाठी सर्वांना समान झाला पाहिजे," हा विचार त्यांनी रुजवला.शेतकरी सावकारी कर्जाच्या विळख्यात का अडकतो, याचे विश्लेषण करताना त्यांनी कृषी पतपुरवठ्याची यंत्रणा सरकारी असावी असे सांगितले. शेतकऱ्यांना कमी व्याजात कर्ज मिळावे आणि त्यांच्या मालाला रास्त भाव मिळावा, यासाठी त्यांनी सहकारी संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी, शेतमजूर आणि वेठबिगारांच्या प्रश्नांना घटनात्मक पातळीवर महत्त्व दिले. खोती पद्धतीविरोधातील लढा, कर्जबाजारीपणा आणि शेतकरी संघटनांची गरज यावर त्यांनी भर दिला. पश्चिम महाराष्ट्रातील दलित व वंचित शेतकरी वर्गावर त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव दिसून येतो.

**पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींचा उदय:**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी चळवळी अधिक संघटित स्वरूपात उदयास आल्या. ऊस दर, पाणीवाटप, कर्जमाफी, वीज दर आणि शेतीमालाला योग्य भाव या मुद्द्यांवर आंदोलन झाली.शेतकरी संघटना – शरद जोशीशरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेने “उत्पादन खर्चावर आधारित भाव” ही संकल्पना पुढे आणली. ऊस, कांदा, दूध दरासाठी केलेल्या आंदोलनांनी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीला वैचारिक दिशा दिली.

**स्वाभिमानी शेतकरी संघटना:**

राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कोल्हापूर, सांगली, सातारा परिसरात ऊस दर, एफआरपी, टोलविरोध आणि दूध दरासाठी प्रभावी आंदोलन केली. या चळवळींमुळे शेतकरी प्रश्न राजकीय अजेंड्यावर आले.

**सहकारी चळवळ आणि शेतकरी आंदोलन:**

पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने हे शेतकरी चळवळींचे महत्त्वाचे केंद्र राहिले आहेत. सुरुवातीला सहकारामुळे शेतकऱ्यांना आर्थिक ताकद मिळाली, परंतु कालांतराने सहकाराचे राजकारणीकरण झाले. थकीत ऊस बिले, भ्रष्टाचार आणि असमान पाणीवाटपामुळे शेतकरी आंदोलन अधिक तीव्र झाली.

**समकालीन काळातील शेतकरी आंदोलन:**

२०२० मध्ये केंद्र सरकारने आणलेल्या या कायद्यांमुळे किमान आधारभूत किंमत आणि बाजार समित्या बंद होतील, तसेच मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून शेतकऱ्यांचे शोषण होईल, अशी भीती शेतकरी संघटनांनी व्यक्त केली. वर्षभर चाललेल्या तीव्र आंदोलनानंतर १९ नोव्हेंबर २०२१ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे तिन्ही कायदे मागे घेण्याची घोषणा केली आणि डिसेंबर २०२१ मध्ये संसदेने ते अधिकृतपणे रद्द केले. तीन कृषी कायद्यांविरोधात पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनीही सक्रिय सहभाग घेतला. अखेरीस हे कायदे मागे घेण्यात आले, हे शेतकरी चळवळीचे महत्त्वपूर्ण यश ठरले.

**निष्कर्ष:**

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ ही केवळ आर्थिक मागण्यांपुरती मर्यादित नसून ती सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांशी निगडित आहे. सहकारी चळवळ, शेतकरी संघटना आणि आंदोलनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी आपले प्रश्न प्रभावीपणे मांडले. भविष्यात शाश्वत कृषी धोरणे, पाणी व्यवस्थापन, बाजारसुधारणा आणि शेतकरी-केंद्रित विकास या माध्यमातूनच या चळवळींचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.

**संदर्भसूची:**


1. खांदवे एकनाथ, शेतकरी संघटना ते स्वतंत्र भारत पक्ष एक वाटचाल, कर्जत,२००७ .
2. कुंभार नागोराव,समकालीन सामाजिक चळवळी,प्रबोधन प्रकाशन,लातूर २०१८.
3. पाध्ये रमेश, शेती,शेतकरी आणि अर्थकारण, युनिक अकॅडमी पब्लिकेशन, पुणे २०१५.
4. सदाफळ विलास दामोदर, महाराष्ट्रातील खंडकरी शेतकऱ्यांची चळवळ, शब्दवैभव प्रकाशन, २०१८
5. डॉ. बी. आर. आंबेडकर, राज्ये आणि अल्पसंख्याक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे, खंड १), (महाराष्ट्र शासन आवृत्ती) १९७९, पृष्ठ. क्र. ४०८
6. Desai A.R., Agrarian Struggles in India after independence, Peasant struggles in India, OUP, 1987
7. Desai A.R., Peasant Struggle in India, Bombay, Oxford University Press 1979.
8. Ghosh, Shibadas, Agrarian Problems and Peasant Movement in India, Socialist Unity Centre of India, march 29, 1970.
9. Hassan, Zoya, Self Serving Guardians Formation and Strategy of the Bhartiya Kisan Union, Economic and Political weekly, December 21, Page No .2965
10. Shah, Ghanshyam, Social Movements in India: A Review of Literature Sage Publication, New Delhi, 2004.
11. Lewis, John, Peasant Rebellions and Communist Revolution in Asia, Standford University Press, California 1974.
12. Singh R. D. and Mehrotra M. K. (1973) "problem of credit and indebtedness with the small and
13. marginal farmers and agricultural labourers", Indian co-operative review, Vol. 10. Balu swami N (1974) "A study on rural indebtedness", Indian co-operative review, Vol. 12.)
14. National council for Applied Economic Research 1974 All India Rural household survey saving Income and Investment New Delhi.
15. Report of the National commission on agriculture (1976), Government of India, New Delhi. Gulati, A (2002), "Indian Agriculture in a Globalizing world", American Journal of Agricultural Economics, Vol. 84, No. 3.
16. Kalpana "Small Cultivators in Bihar and New Technology choice or compulsion?" Economic and political weekly, March, 2002. )
17. Patil Babasaheb Vikhe (2005), "Rural Banking: Problems of Localized Banking Institutions", Economic political weekly - 2005.
18. Ramesh Goliath (2007) "Current Issues in agriculture credit in India: As Assessment" Reserve Bank of India occasional papers, Vol. 28, No. 1, Summer 2007.